<u>**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**</u>

**प्रेस नोट दि.२६/०३/२०१९**

<u>**दि.२५/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**</u>

<u>**भाग-१ ते ५ चे गुन्हे**</u>

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ३०२/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | अथर्व घुले,वय-२१ वर्षे,रा.प्रभात रोड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०३/२०१९ रोजी १७/०० ते १७/३० वा.चे दरम्यान हनुमान मंदिराचे पुढे उजव्या बाजुस अंदाजे १५० मीटर गेल्यानंतर हनुमान टेकडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व्यायाम करण्यासाठी नमुद ठिकाणी जात असताना,नमुद चार अनोळखी इसमांनी त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे जबरदस्तीने खिशात हात घालुन,त्यांचेकडील मोबाईल व पाकीटा मधील रोख ५०० रुपये असा एकुण ४,५००/- रू किचा ऐवज काढुन घेऊन वेताळ टेकडी बाजुने पळुन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. टी.एम.फड ९८२३०५७१४१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १०९/१९,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | संतोष खेतमाळस, सहा.पोलीस निरीक्षक, डेक्कन पोलीस स्टेशन पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०३/२०१९ रोजी १८/३० वा. आयएलएस लॉ-कॉलेज येथील कॅन्टिन गेट येथील अंतर्गत रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्यांचे ताब्यातील कार ही वाहतुकिचे नियमांकडे दुर्लक्ष करून, नो-पार्किग मध्ये पार्क करून,कारचा दरवाजा हलगर्जीपणा व निष्काळजीपणे उघडतांना मागे न पाहील्या मुळे,नमुद ठिकाणहुन स्कूटीवरील चालक विलास कृष्णा नगरकर हे सदरील कारचे उघडलेल्या दरवाजाला धडकुन खाली पडुन,त्यांचे डोक्याला व हाता-पायांना गंभीर दुखापत झाल्याने,त्यांचेवर उपचार चालु असताना,ते उपचारा दरम्यान दि.२०/०३/२०१९ रोजी सकाळी ०६/३० वा. मयत झाले आहेत. तरी सदरील कारचालक हे स्कूटीचालक विलास नगरकर यांचे मृत्यूस कारणीभूत झाले आहेत. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. एस.एन.निकम ८६६८७०७६७२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १२५/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३२ वर्षे,रा.बिबवेवाडी रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल व बँकेचा खातेधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/११/२०१८ रोजी १२/०० वा. बँकेचे खाते नंबर व गुगल पे-ॲप(तेज) नंबरवरुन मगरपट्टा,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी ॲमेझॉन पेटीएम पेमेंट्स बँक लिमी.चे खात्यावरील नमुद अज्ञात मोबाईल व बँकेचा खातेधारक याने फिर्यादी यांचे मोबाईल नंबरवरुन फिर्यादीं यांची सर्व कागदपत्रांची माहीती घेवुन,तुम्ही ॲमेझॉनचे प्राईम मेंबर आहात असे सांगुन,आमची कंपनी तुमचे प्रमोशन करीत आहे. त्यामुळे सध्या तुम्हाला ॲमेझॉनकडुन ऑफर असुन,तुम्ही ॲमेझॉनचे ५,०००/- रु किंचे शॉपींग व्हाऊचर खरेदी करा,त्यावर तुम्हाला लॅपटॉप गिफ्ट मिळेल असे सांगुन,फिर्यादी यांचे बँकेचे खाते नंबर व गुगल पे ॲप(तेज) या खात्यामधुन ५२,९९६/- रुपये ऑनलाईन ट्रान्झेक्शन करुन,फिर्यादी यांना लॅपटॉप न देता त्यांचे अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. मुरलीधर कर्पे ९८७०२९८८७० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १०८/१९,भादविक ४०६,४२०,४४७,४६७,४६८,४७१,४७४,३४१,५०६(१) |
| **फिर्यादी** | सलील शेट्टी,वय-३४ वर्षे,रा.मॉडल टाऊन,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०६/२०१६ रोजी ते आजपर्यंत १२२७ एफ.सी.रोड येथील हॉटेल शिवाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हा नमुद हॉटेल मध्ये ॲडमिस्टेटर / मॅनेजर म्हणुन फिर्यादी यांची आजी यांनी दि.०१/०७/२०११ ते दि.३०/०६/२०१६ रोजीपर्यंत पाच वर्षासाठी केलेला करार मुद्त संपण्याच्या अगोदर दि.०४/०६/२०१६ रोजी लिगल नोटीस देवुन करार रद्द करुन,फिर्यादी यांना सदर हॉटेलचा व्यवसाय पाहण्यासाठी नोटराईजड ॲग्रीमेंट व पॉवर ऑफ ॲटर्नी करुन हॉटेलचा व्यवहार पाहण्यास सांगितला असतांना,फिर्यादीस हॉटेल मध्ये येवु न देता,रद्द झालेले लिव्ह ॲन्ड लायसन्स खरे आहे असे सरकारी कार्यालयात भासवुन,सदरचे हॉटेल चालविण्यासाठी लागणारे शॉप ॲक्ट, फुड ॲन्ड हेल्थ व इतर लायसन्स अधिकार नसतांना स्वतःचे नावावर सरकारी कार्यालया मध्ये खोटी प्रतिज्ञापत्रे देवुन,कागदपत्रे सादर करुन ट्रान्सफर / नोंद करुन,फिर्यादी यांचे हॉटेल न सोडता,त्यांचे हॉटेलच्या व्यवसाया मधुन मिळणारी रक्कम स्वतः घेवुन,फिर्यादी यांची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.आर.काटे ९९२३३६०९६६ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २६८/१९,भादविक ३२८३०९ |
| **फिर्यादी** | जीवन मोहिते, पोउपनिरी. सिंहगड पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | एक महिला,वय-२७,धंदा-मजुरी,रा.सनं.७,न-हे,पुणे (ॲडमीट आहे.) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०३/२०१९ रोजी सकाळी ११/०० वा.सनं.७,अनंत केशव भुमकर यांचे शेतात जेएसपीएम कॉलेजचे मागे,न-हे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद महिला हिने तीचे व तीचा पती याचेबरोबर झालेल्या भांडणाचा राग मनात धरून,नमुद वेळी व ठिकाणी तीचे पती हे कामावर गेल्यानंतर तीचे घरातील फवारणी कराचे किटनाशक औषधे हे तीचे घरातील गायीचे दुधात मिक्स करून,तीची मुलगी प्रांजली,वय-०५ वर्षे व आदित्य ०४ वर्षे,रा.सनं.७,न-हे,पुणे यांना दोन वाटीत देवुन ते त्यांना दिले. तसेच महिला हिने स्वतः देखील दुध पिवुन,स्वतः आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच सदर महिला हिने स्वतःचे व दोन्ही मुलांचे जिवीतास धोका निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.डी.पाटील ८८०५२४२४०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**